**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ५७/०२ दिनांक :- ०८ जानेवारी, २०२४

प्रसिद्धिपत्रक

# 'म्हाडा'मध्ये पहिला लोकशाही दिन उत्साहात

१५ अर्जांवर सुनावणी, तात्काळ कार्यवाहीचे म्हाडा उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांचे संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश

मुंबई, दि. ८ जानेवारी, २०२४ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामध्ये (म्हाडा) लोकशाही दिन आज उत्साहात पार पडला. 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या पहिल्या लोकशाही दिनासाठी १५ अर्ज प्राप्त झाले. या सर्व अर्जदारांचे म्हणणे ऐकून घेत संबंधित अर्जदारांच्या अर्जाबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील मुख्यालयातील चौथ्या मजल्यावर झालेल्या लोकशाही दिनाला मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद शंभरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे, 'म्हाडा'चे सचिव श्री. राजकुमार सागर, सहमुख्य अधिकारी श्री. उमेश वाघ, सहमुख्य अधिकारी श्रीमती नीलिमा धायगुडे आदी उपस्थित होते.

आज झालेल्या लोकशाही दिनाच्या निमित्ताने प्राप्त १५ निवेदन/अर्जांपैकी ०५ अर्ज मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे होते तर ०९ अर्ज मुंबई मंडळाशी व एक अर्ज पुणे मंडळाशी संबंधित होता. अर्ज /निवेदनातील तक्रारींनुसार संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह चर्चा करून श्री. जयस्वाल यांनी निवेदन/अर्जांवर तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना आज दिले. तसेच निवेदन अर्जांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल येत्या १५ दिवसांत देण्याचे निर्देशही श्री. जयस्वाल यांनी आज दिले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणामध्ये (म्हाडा) आता प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी 'म्हाडा लोकशाही दिन' म्हाडाच्या वांद्रे पूर्व येथील गृहनिर्माण भवनातील चौथ्या मजल्यावरील सभागृहात दुपारी १२.०० वाजता आयोजित करण्यात येणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण


म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA


म्हाडा
MHADA